# मनोरमा को-ऑप बँक लि.,सोलापूर

४,५,६,७,८ कोटणीस नगर,विजापूर रोड,सोलापूर. फोन : ०२१७-२३०१८८०,२६२६९००,२३००६८०
Email : manorama_bank@rediffmail.com, Website : www.manoramabank.org, www.manoramabanksolapur.com

## संस्थापक अध्यक्ष कै. सदाशिव रामचंद्र मोरे (दाजी)

नोंदणी क्र. एस.यु.आर./बी.एन.के./(ओ) १२० आर.बी.आय. लायसन्स नं. युबीडी/
सन १९९६-९७ दिनांक. २४.१२.१९९६ महा.१३८१ पी. दिनांक. २५.०२.१९९७

## २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

मनोरमा को-ऑप बँक लि.,सोलापूर या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. १७/०९/२०२३ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता** मनोरमा भवन मिटिंग हॉल ,नवीन आर.टी.ओ. ऑफीस समोर,बेन्नूर नगर,विजापूर रोड, सोलापूर येथे होणार आहे.सदर सभेपुढील विषय खालीलप्रमाणे आहेत. सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय**

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२२-२३ ते २०२७-२८ या कालावधीसाठी नवीन संचालक मंडळाची बिनविरोध नेमणूक झाली सदर गठीत नूतन संचालकांची वाचून नोंद घेणे.
३. दि. ३१.०३.२०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेला ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे व सन २०२१-२२ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाची दोष दुरुस्ती अहवालासह मंजुरीसाठी सादर.
४. सन २०२२-२३ च्या नफावाटणीस मंजुरीसाठी सादर व संचालक मंडळाने शिफारस केलेला लाभांश मंजुरीसाठी सादर.
५. सन २०२२-२३ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२३-२४ या वर्षाकरिता मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर.
६. सन २०२३-२४ या सालासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व मंजुरीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पाठवणे मंजुरीसाठी सादर.
७. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे बँकेच्या नवीन शाखा उघडणेबाबत परवानगी प्रस्ताव पाठवणे मंजुरीस्तव सादर.
८. बँकेच्या संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची नोंद घेणे.
९. बँकेच्या पोटनियमातील दुरुस्ती मंजुरीसाठी सादर. पुरवणी अ प्रमाणे
१०.महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ४९ नुसार कर्ज निर्लेखन करणेबाबत निर्णय घेणे. पुरवणी ब प्रमाणे
११.बँकेतील इमारत निधी(Building Fund) बँकेच्या संशयीत व बुडीत (BDDR) निधीस वर्ग करण्यास मंजुरी घेणे.
१२.बँकेच्या सन २०२३-२४ सालासाठी कर्ज नियमावली व इतर नियमावली ठरविणे व मंजुरी घेणे.
१३.मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ०१/०९/२०२३**

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून
**सौ शिल्पा महेंद्र कुलकर्णी(मोहिते)**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :**

१. ज्या सभासदांना अद्याप आपला मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर केलेला नाही,त्यांनी आपला मोबाईल क्रमांक बँकेकडे रजिस्टर करावा.
२. सन २०२२-२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक बँकेच्या कार्यालयात नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आला आहे. तसेच बँकेच्या वेबसाईटवर देखील अपलोड करण्यात आलेला आहे. बँकेची वेबसाईट www.manoramabank.org www.manoramabanksolapur.com
३. ज्या सभासदांना या संदर्भात काही लेखी सूचना द्यावयाच्या असतील तर त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाले पासून सात दिवसात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यकार्यालय,प्लॉट नं. ४/५/६/७/८, कोटणीस नगर,विजापूर रोड,सोलापूर किंवा नवीन आर.टी.ओ. ऑफीस समोर,बेन्नूर नगर,विजापूर रोड, सोलापूर यांच्याकडे लेखी द्याव्यात.मुदतीनंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.